# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०२०/322

दिनांक :- 28 JAN 2020

प्रति,

प्राचार्य,

शासकीय/अनुदानित/विनाअनुदानीत/पदविका/पदवी/पदव्यूत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था

औरंगाबाद विभाग

**विषय**:- उच्च शिक्षण संस्थामध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलती देणे बाबत.

संदर्भ:-१) मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.१६/आस्था/दिव्यांग सवलती/२०२०/३३ दि.२०.०१.२०२०

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, संचालनालयाच्य अधिनस्त असणा-या संस्थामध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती देण्यात येतात याबाबतचा अहवाल मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुबई यांचे कडुन शासनास वरील संदर्भीय पत्रान्वये सादर करण्यात आला आहे.

संचालनालयाच्या पत्रातील मुद्या क्र. १ ते ६ मधील सोयी, सवलती बाबत आपल्या संस्थेकडुन कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास त्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. भविष्यात या बाबत काही अडचणी उद्‌भवल्यास आपली संस्था जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

सोबतः वरील प्रमाणे

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सादर

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १६/आस्था/दिव्यांग सवलती/२०२०/३३

दिनांक : 20/1/2020

प्रति,
मा. सचिव, महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई.

विषय : उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलती देण्याबाबत.

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३, दिनांक १८.४.२०१९

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र./३०२/विशि-३, दिनांक २७.८.२०१८ नुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असणा-या संस्थांमध्ये दिव्यांगांना देण्यात येणा-या सर्व प्रकारच्या सोयी व सवलती बाबतचा अहवाल खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रवेश सवलत | या संचालनालयामार्फत दरवर्षी अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी आणि इतर पदविका अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. सदर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दिव्यांगांना ५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. |
| २ | परिक्षेमध्ये सुविधा | १) दिव्यांग विद्यार्थ्यांना परिक्षेत विद्यापिठाच्या परवानगीने उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी ३० मि. अतिरिक्त वेळ दिला जातो.<br>२) दिव्यांग विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये पेपर लिहीण्याकरीता लेखणीक पुरविण्यात येतो.<br>३) अशंतः अंध विद्यार्थ्यांकरिता परिक्षेत प्रश्नपत्रिकेमधील प्रश्नांचा आकार वाढीव करण्यात येतो.<br>४) दिव्यांग विद्यार्थ्यांना शक्यतो जवळचे परिक्षा केंद्र देण्यात येते.<br>५) दिव्यांग विद्यार्थ्यांना आकस्मिक उपचाराची परिस्थिती निर्माण झाल्यास पु:न्हा परिक्षेची परवानगी देण्यात येते. |
| ३ | शैक्षणिक सुविधा | १) दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांचे सोईनुसार कमी उंचीचे बेंच व डेस्क बनविण्यात आलेले आहेत.<br>२) दिव्यांग विद्यार्थ्यांचे संस्थांमधील प्रत्येक विभागात प्रथम प्राधान्याने त्यांचे काम पार पाडली जातात.<br>३) शासन निर्णयाप्रमाणे दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सवलत देण्यात येते.<br>४) तसेच काही संस्थांमध्ये नॉन फॉर्मल कोर्ससाठी सुरू असलेल्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना पाठ्यवेतन दिले जाते.<br>५) शासन नियमाप्रमाणे दिव्यांग शिक्षकीय व शिक्षकेतर पदे भरण्यात येतात.<br>६) संस्थेमध्ये वाचनीक/सूचक उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.<br>७) काही संस्थांमध्ये ऑडियो/व्हिडीयो रेकॉर्डर ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्रवेश सुलभता व विना अडथळा परिचालन | १) संस्थांच्या मुख्य इमारतींमध्ये प्रवेशव्दारांमध्ये किंवा तळमजल्यावर दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प बांधण्यात आलेले आहेत. त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना सहजतेने ये-जा करता येते.<br>२) संस्थेच्या इमारतीमध्ये इतर विभागात वरच्या मजल्यावर जाण्याकरिता रेलिंग ची व्यवस्था करण्यात आलेली आहे.<br>३) काही संस्थांमध्ये दिव्यांगांकरिता वाहनतळाची सोय करण्यात आलेली आहे.<br>४) काही संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना व्हिलचेअर उपलब्ध करून दिलेल्या आहेत.<br>५) काही संस्थांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना अंतर्गत ये जा करण्याकरिता किंवा चालण्याकरिता walking Aid ची व्यवस्था करण्यात आली आहे.<br>६) संस्थांमध्ये दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनींना प्रसाधनगृहाचा सुलभतेने वापर करता यावा यासाठी प्रसाधनगृहात विशेष सोय केलेली आहे. |
| ५ | अध्यापन शास्त्र व अभ्यासक्रमातील सुलभता | १) अशंत: अंध विद्यार्थ्यांसाठी काही संस्थांमध्ये आवाजाच्या गणक यंत्राच्या वापरासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच विशिष्ट प्रकारच्या पेन्सिल, पेन/ग्रीपर यांची उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.<br>२) काही संस्थांमध्ये स्क्रिन रिडींग सॉफ्टवेअर संगणकाची सुविधा उपलब्ध आहे.<br>३) काही संस्थांमध्ये लोकोमोटर डिसेबिलीटी अस्थिव्यंग/बहुविकलांगता सेरेब्रल पाल्सी विद्यार्थी Voice Synthesizer व Communication Board प्रणाली परीक्षेच्या काळात आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देण्यात येतात.<br>४) काही संस्थांमध्ये मानसिक आजार असलेले विद्यार्थी आक्रमक / हिंसक बनल्यास परिस्थीती हाताळू शकेल अशा पर्यवेक्षकाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. |
| ६ | वसतिगृह सुविधा | १) संस्थांच्या वसतिगृहांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कमोड सिस्टीम शौचालय बनविण्यात आलेले आहे.<br>२) दिव्यांग विद्यार्थ्यांना संस्थेतील वसतिगृहामध्ये राहण्याकरीता तळमजल्यावरील खोली उपलब्ध करून दिल्या जाते.<br>३) संस्थांमधील वसतिगृहांत दिव्यांगासाठी रॅम्प बांधण्यात आलेले आहेत. |

आपला,

( डॉ. अभय वाघ )
**संचालक,**
**तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत : १) मा. आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीकरिता सादर.

२) सहसंचालक, विभागीय कार्यालय, मुंबई / पूणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील ज्या संस्थांमध्ये दिव्यांगांना आवश्यक सोयी व सवलती पुरविण्याबाबतची कार्यवाही अद्यापी पूर्ण झालेली नाही अशा संस्थांना सदर बाबी पूर्ण करणेबाबतचे निर्देश आपल्या स्तरावरून देण्यात यावे.

शिक्षण सर्व संस्थांना कळवावे
20/1/20